# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/09/2023 (सोमवार) दुपार

---

## अवैध्य मोहाफुल रसायण साठयावर
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीणची कारवाई :—

दिनांक ०३/०९/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे. रामटेक हद्दीतील उमरी शिवारात अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना मुखबीर कडुन मिळालेल्या माहिती वरून उमरी शिवारात मोहाफुल गावठी भट्टीवर रेड केली असता फरार **आरोपी नामे— नितीन मोरेशिया रा. रामटेक जि. नागपूर** या नावाचा इसम दगड विटाच्या चुलीवर अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची भट्टी तयार करून दारू गाळत असल्याबाबत गोपनिय बातमी मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण येथील स्टाफने नमुद घटनास्थळी अवैध मोहाफुल दारू भट्टीवर छापा मारून त्याचे ताब्यातुन १) १८०० हजार लीटर मोहाफुल सडवा रसायन एकूण किंमती अंदाजे १,८०,०००/—रू. २) ६० लिटर मोहाफुल दारू किंमती ६०००/— रु ३) मोहाफुल दारू गाळण्याचे इतर साहित्य किंमती ३२००/—रु असा एकुण १,८९,२००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे रामटेक येथे कलम ६५ (ई) (क) (फ) (ब) मदाका. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष ए. पोद्दार सर (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले सर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांच्या सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चोधरी, रोशन काळे पोलीस नायक नितेश पिपोरदे, प्रमोद भोयर, विपीन गायधने, शंकर मडावी, उमेश फुलबेल यांचे पथकाने केली.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. बेला :—** दिनांक ०२/०९/२०२३ चे ०८.०० वा. ते ११.०० वा. दरम्यान पो.स्टे. बेला हद्दीत फिर्यादी हीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ०२ महीने ही घरी हजर होती. दिनांक ०२/०९/२०२३ चे ०८/०० वा. फिर्यादी व तिची सासु शेतात कामाला गेले होते. फिर्यादीचा मुलगा हा देखील शाळेला गेला होता. फिर्यादी व तिची सासु १५/०० वा कामावरून घरी परत आले तेव्हा फिर्यादीची मुलगी घरी दिसली नाही. फिर्यादीचे मुलाने पण सागीतले की तो शाळेतुन सकाळी ११/०० वा घरी आला तेव्हा ती घरी नव्हती फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ०२ महीने हीला १) विधीसंघर्ष बालक २) मनिष टिळक कोहळे, वय २३ वर्ष, दोन्ही रा. किन्हाळा यांनी फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बोळगीर पोस्टे बेला हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर